महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.७१/पदभरती/का-४** **दि.१३-०२-२०२४**

## परिपत्रक क्र.४५

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील विविध शासकीय संस्था/कार्यालयातील गट-क संवर्गातील विविध ७७२ पदे भरण्याकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याबाबत दि.१६/०२/२०२३ रोजी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज केलेल्या उमेदवारांची सामायिक परीक्षा (CBT) रविवार दि.१६/०४/२०२३ रोजी घेण्यात आली होती. सामायिक परीक्षेत (CBT-१) पात्र ठरलेल्या व विहित शुल्कासह व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता अर्ज केलेल्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी (CBT-२) रविवार दि.२१/०१/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर परीक्षेची (CBT-२) **उत्तरतालिका (Answer key) दिनांक १४/०२/२०२४ रोजी उमेदवारांच्या लॉगीन मध्ये उपलब्ध करुन देण्यांत येणार आहे.**

सदर उत्तरतालिका संदर्भात उमेदवारांना हरकती (objections) सादर करावयाच्या असल्यास जाहिरातीमधील अ.क्र.१८.१३ मध्ये नमूद तरतुदीनुसार उमेदवारांनी दिनांक १४/०२/२०२४ ते १६/०२/२०२४ या कालावधीत स्वत:च्या लॉगीन मधून प्रश्नांसंबंधित हरकती आवश्यक अभिलेख्यासह (alongwith documents) विहित आक्षेप हाताळणी शुल्क (विनापरतावा) (Objection handling fees-Non refundable) अदा करुन ऑनलाईन पध्दतीने सादर कराव्यात.

विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील, अन्य कोणत्याही मार्गाने / पध्दतीने तसेच विहित कालावधीनंतर सादर केलेल्या हरकती कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत. विहित कालावधीत प्राप्त झालेल्या हरकतींचीच दखल घेतली जाईल. तरी संबंधित उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

**Login Link :** https://cdn3.digialm.com//EForms/configuredHtml/32330/81005/login.html

स्वाक्षरीत/-
( दि. अं. दळवी )
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.